महाराष्ट्र शासन
# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
Email Id: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र.:विकाऔ/शिक्षण/२०२२/ 1555 दिनांक : 11 MAY 2022

अतितात्काळ-महत्वाचे-कालमर्यादित

प्रति,

**प्राचार्य/संचालक**

सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित

पदविका/पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था,

औरंगाबाद विभाग.

विषय : - **शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता डीबीटी पोर्टलवरील संचालनालयातंर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या कार्यवाहीबाबत (मुदतवाढ)...**

संदर्भ :
१. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२१-२२/४५६, दि. १७/११/२०२१.
२. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२१-२२/४८९, दि. २०/१२/२०२१.
३. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२१-२२/०५, दि. ०५/०१/२०२२.
४. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२१-२२/१८, दि. ०३/०२/२०२२.
५. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२१-२२/४६, दि. ०८/०३/२०२२.
६. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२१-२२/९९, दि. ०५/०४/२०२२.
७. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२१-२२/११५, दि. ०६/०५/२०२२.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता महाडीबीटी पोर्टलवर तंत्रशिक्षण संचालनालयाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत या कार्यालयाच्या सर्व अधिनस्त संस्थांना डीबीटी पोर्टलवरील योजनांच्या लाभासाठी विद्यार्थ्यांना अर्ज भरण्याची अंतिम मुदत दिनांक ३०/०४/२०२२ असल्याबाबत कळविण्यात आलेले होते.

**आता डीबीटी पोर्टलवर शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी तसेच शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज Sent back अंतर्गत आहेत अशा विद्यार्थ्यांना देखील दिनांक ३१/०५/२०२२ पर्यंत Re-apply करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.**

तरी या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संस्थांना सूचित करण्यात येते की, ज्या पात्र विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज भरलेला नाही अशा पात्र विद्यार्थ्यांकडून दिलेल्या वाढीव मुदतीच्या आत अर्ज भरुन घ्यावेत. जर पात्र विद्यार्थी योजनेचा अर्ज भरण्यापासून वंचित राहिल्यास सर्वस्वी जबाबदारी ही आपल्या संस्था प्रमुखांची राहील, याची नोंद घ्यावी.

तसेच, डीबीटी डॅशबोर्डनूसार दि. ०९/०५/२०२२ रोजीची वर्षनिहाय प्रलंबित अर्जांची स्थिती सोबत जोडलेली आहे. सदर डीबीटी डॅशबोर्ड तपशील संबंधित संस्थेच्या लॉगीनमध्ये देखील उपलब्ध आहे तरी संबंधित संस्थांनी त्यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध असलेल्या वर्ष निहाय डीबीटी डॅशबोर्डचे (सन २०२०-२१ व २०२१-२२ इ.) ठराविक कालावधीच्या अंतराने वेळोवेळी स्वत:हून अवलोकन करुन खालील तक्त्याप्रमाणे प्रलंबित अर्जावर अंतिम मुदतीपर्यंत वाट न पाहता त्वरीत निकाली (मंजूर/नामंजूर) काढावेत.

| अ.क्र. | डीबीटी डॅशबोर्ड रिपोर्ट तपशील | संस्थांनी मुदतीच्या आत करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १. | संस्था स्तरावर तपासणीसाठी प्रलंबित अर्ज | संस्थांनी त्यांच्या लॉगींन मध्ये अर्ज तपासणीसाठी प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनूसार तपासणी (मंजूर/नामंजूर) करुन निकाली काढावेत. तसेच जर विद्यार्थी संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनूसार पात्र नसेल तर अर्ज Sent back न करता संस्थास्तरावरुन नामंजूर करावे. |
| २. | संस्थांनी विद्यार्थ्यांना परत पाठविलेले अर्ज (Sent back अंतर्गत) | संस्थांनी विद्यार्थ्यांना अर्जाची त्रुटी दूर करण्याबाबत कळवून अर्ज भरुन घेऊन अंतिम मुदतीच्या आत निकाली काढण्यात यावेत. |
| ३. | डीबीटी पोर्टलकडून अलॉटमेंट करण्यात न आलेले अर्ज (Not Alloted) | संस्थांनी Not Alloted विद्यार्थ्यांच्या अर्जासोबत दिलेल्या कारणांचे अवलोकन करुन अपेक्षित त्रुटी दूर करण्याबाबत कळवून अर्ज भरुन घेऊन अंतिम मुदतीच्या आत निकाली काढण्यात यावेत. |
| ४. | संस्थास्तरावर विद्यार्थ्यांचा उपस्थिती अहवाल भरण्यासाठी प्रलंबित अर्ज | संबंधित संस्थांनी त्यांच्या लॉगींन मध्ये दुसऱ्या हप्त्याची रक्कम अदा करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांचा उपस्थिती अहवाल भरण्याची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी. |

तरी वरील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे व संस्थास्तरावर अर्ज प्रलंबित राहणार नाहीत याची संस्थांनी योग्य ती दक्षता घ्यावी. या संदर्भात भरलेल्या अर्जावर विहीत वेळेत कार्यवाहीत दिरंगाईबद्दल सर्वस्वी जवाबदारी प्राचार्यांची राहील याची गाभीर्याने नोंद घ्यावी.

(उमेश नागदेवे)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत: - मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.